**: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७/२०२४ मधील नि. ३९ खालील आदेश –:**

(दिपा चंद्रशेखर जाधव व.४ विरुध्द सुकी डेव्हलपर्स देवाकी रॉयल व.६)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द झालेला दावा उपशमित आदेश रद्द होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १०/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत परंतु ९० दिवसांच्या आत वारस रेकॉर्डवर आलेले नाहीत. सबब त्यांचे विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्दबातल होऊन प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतचा आदेश व्हावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, सदरचा दावा हा मयताविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे, त्यामुळे दावा चालण्यासारखा नाही. सदरचा दावा हा जाणून बुजून मयता विरुध्द दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ हा दिनांक १०/११/२०२३ रोजी मयत झाला आहे. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र. ४ यांचे

वारस मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा हक्कप्रस्थापना होऊन मिळणेसाठी व प्रतिवादीविरुध्द कायमच्या ताकीदीकरीता करीता दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द झालेला दावा उपशमितचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ४ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज १ वर्षे ५ महिने १३ दिवसांच्या विलंबाने दिलेला आहे असे दिसून येते. सदरचा दावा गुणदोषावर पुढे चालविण्याच्या दृष्टीने तसेच, मयत प्रतिवादी क्र. ४ यांच्या वारसांना त्यांची बाजु मांडण्याच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायाचे कारणास्तव संधी देणे न्यायोचित ठरेल. सदरचा विलंब हा नि. ३८ च्या आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ चे कायदेशीर वारस रेकॉर्डवर आणण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी व न्यायालयाचा वेळ खर्ची झाल्याने वादी यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादीना रक्कम रुपये ३००/–(रु. तीनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.05.07 18:00:31 +0530

दिनांक– ०७/०५/२०२५ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ